श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिति, पंढरपूर

**सी.सी.टी.व्ही. कॅमेरे भाडेतत्वावर बसविणे कामाची जाहीर दरपत्रक**

आषाढी यात्रा २०१६ साठी श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर व दर्शन रांगे मध्ये एकूण २५ ठिकाणी सी.सी. टी.व्ही. कॅमेरे भाडेतत्वावर बसविण्याचे आहे. त्यासाठी दरपत्रके मागविणेत येत आहेत. या संबंधीची माहिती, अटी, शर्ती व दरपत्रक फॉर्म तुकाराम भवन, पंढरपूर येथे आणि www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. इकडील नमूना फॉर्ममध्येच दरपत्रक भरून देणेचे आहे. सोबत अनामत रक्कम रु.१०,०००/– डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. सिलबंद दरपत्रक कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिति, पंढरपूर यांचे नांवे दिनांक /०६/२०१६ रोजी सायं. ५:०० वाजेपर्यंत पोहोचेल अशी पाठवावी. प्राप्त निविदा दिनांक /०६/२०१६ रोजी तुकाराम भवन येथे सायं ५:०० वा. उघडल्या जातील.

क्र.संगणक विभाग/कावि/ /२०१६ दि. /०६/२०१६

सही xxx
कार्यकारी अधिकारी
(संपर्क क्र. ०२१८६–२२३५५०,
८७९३१९५९५८,)

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

**दरपत्रक फॉर्म**

**सी.सी.टी.व्ही.कॅमेरे भाडेतत्वावर बसविणे कामाचे दरपत्रक**

(आषाढी यात्रा २०१६)

प्रति,
मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर.

विषय:– **आषाढी यात्रा २०१६.**
सी.सी.टी.व्ही.कॅमेरे भाडेतत्वावर बसविणे कामाचे दरपत्रक....

ठेकेदाराचे पूर्ण नाव :– ––––––––––––––––––––––––––––––

पूर्ण पत्ता :– ––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––

मोबाईल क्रं.:– ––––––––––––––––––––––––––––––

महोदय,

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने आषाढी यात्रा २०१६ निमित्त सुरक्षेच्या दृष्टीने मंदिर, मंदिर परिसर व दर्शन बारी मध्ये सी.सी.टी.व्ही.कॅमेरे भाडेतत्वावर बसविणेचे कामाचे दिनांक /०६/२०१६ रोजीचे दैनिक वर्तमानपत्र –––––––––––– मध्ये प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदाप्रमाणे सदर कामाचे दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

| **अनं** | **तपशील** | **संख्या** | **कामाचा कालावधी** | **दर (रू.)** |
|---|---|---|---|---|
| १ | सी.सी.टी.व्ही. कॅमेरे | २५ (१९ स्थिर कॅमेरे व ८ फिरते कॅमेरे) | ११ ते १९ जुलै २०१६ (१० जुलै रोजी सर्व यंत्रणा कार्यान्वीत झाली पाहिजे) | |
| २ | डी.व्ही.आर. (१६ चॅनल) | २ | ––''–– | |
| ३ | शुटींग रेकॉर्डिग करण्यासाठी हार्ड डिस्क | १ (२ टी.बी) | – | |
| | | | **एकूण** | |

वर नमुद केलेल्या दराप्रमाणे ठरवून दिलेल्या वेळेत काम करून देण्यास तयार आहे. तसेच याबाबत दिलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. तरी वर नमुद केलेले काम मला मिळण्यास विनंती आहे.

दिनांक /०६/२०१६ ठेकेदाराची सही

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत

१. अनामत रक्कमेचा डी.डी/ पावतीची झेरॉक्स प्रत.
२. पूर्वी केलेल्या कामाच्या अनुभवाची प्रमाणपत्रे.
३. स्वत:च्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत. (उदा. पॅनकार्ड, मतदान कार्ड व आधारकार्ड)
४. पॅन कार्ड.

**श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

**सी.सी.टी.व्ही. कॅमेरे भाडेतत्वावर बसविणे कामाबाबत**

**(आषाढी यात्रा २०१६)**

**माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....**

१. नमूना दरपत्रक फॉर्म कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील. दरपत्रक फॉर्म स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक कोणत्या कामासाठी भरलेले आहे त्याचा सविस्तर तपशिल नमुद करावा. दरपत्रक समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेली दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत.

२. अनामत रक्कम रु.१०,०००/— डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. डी.डी. 'कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर' यांचे नावे काढावा.

३. कॅमेरे बसविणेचे ठिकाण— (१) व्हि.आय.पी गेट समोरील बाजू (२) तुकाराम भवन समोरील बाजू (३) दर्शन मंडप पाठीमागील बाजूस (४) सराफ कट्टा (५) विणे गल्ली (पश्चिम बाजू) (६) विणे गल्ली (पूर्व बाजू) (७) चंद्रभागा घाट (८) साखरे मठासमोर (कासार घाट ते चंद्रभागा घाटाच्या मध्ये) (९) महाद्वार (पोलीस स्टेशन समोर) (१०) महाद्वार ते पुंडलिक मंदिर (११) कासार घाट पुल (१२) पश्चिमद्वार (१३) नामदेव पायरी (१४) लक्ष्मी सदन — फिरता कॅमेरा (गंगू काका शिरवळकर मठाजवळ) (१५) कासार घाट (१६) चौफाळा— फिरता कॅमेरा (१७) विप्रदत मंदिर ते भुतेश्वर मंदिर (१८) पत्राशेड येथे ८ कॅमेरे (पैकी ४ फिरते कॅमेरे)

४. वापरण्यात येणारे सर्व कॅमेरे व इतर साहित्य उच्च दर्जाचे नामांकित कंपनीचे वापरायचे आहे.

५. बसविणेत येणाऱ्या सर्व कॅमेरांचे प्रक्षेपण मंदिर समितीच्या नियंत्रण कक्षास जोडणे अनिवार्य आहे.

६. सदर कामासंबंधी समितीचे कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापक आणि सी.सी.टी.व्ही विभाग व संबंधित कर्मचारी यांचे सुचनेप्रमाणे काम करणे आवश्यक राहील.

७. बसवलेले कॅमेरे नादुरूस्त होणार नाही याची दक्षता घेणेची आहे. कॅमेरे, स्क्रिन, डी.व्ही.आर. इ.ची देखभाल व दुरूस्ती ठेकेदारांनी वेळेत करणेची असून त्यासाठी जास्तीत जास्त तंत्रज्ञ व मजुर कामाच्या ठिकाणी २४ तास उपलब्ध करून ठेवणेचे आहेत.

८. कॅमेरे व कॅमेरेसाठी बसविण्यात आलेल्या साहित्यामुळे दर्शनरांगेतील भाविकांना धोका निर्माण होणार नाही याची दक्षता घेणेची आहे.

९. दरपत्रकात नमुद साहित्याचा दर सर्व करासहीत नमुद करावा. साहित्य पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

१०. दरपत्रकात नमुद सर्व साहित्यांचा दर नमूद करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

११. सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के T.D.S. कपात केली जाईल.

१२. सदरचे कॅमेरे बसवितेवेळी त्या ठिकाणी व मंदिरास कोणत्याही प्रकारचा धक्का लागून नुकसान होवू नये याची अत्यंत काटेकोरपणे दक्षता घ्यावयाची आहे.

१३. कॅमेरे बसवितेवेळी आपलेकडिल कामगारांना अपघात होणार नाही याची दक्षता घ्यावयाची आहे. तसे काही घडल्यास सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहील.

१४. सदरचे काम निविदा फॉर्ममध्ये नमुद केलेल्या दिनांका पूर्वी पुर्ण करणेची आहेत. तसे न केल्यास दंडात्मक कारवाई करणेचे पुर्ण अधिकार मंदिर समितीकडे राहतील.

१५. सदर कामाच्या संबंधीचा टेस्ट रिपोर्ट दि.१०.०७.२०१६ रोजी सायं ५.००वा. कार्यकारी अधिकारी यांना समक्ष सादर करावयाचा आहे.

१६. सदर कॅमेरेद्वारे शुटींग झालेल्या रेकॉर्डिंगची हार्ड डिस्क काम पुर्ण झालेनंतर तात्काळ या कार्यालयाकडे जमा करण्यात यावी.

१७. सदर कॅमेरेद्वारे करण्यात आलेली शुटीग बाबत गोपनीयता ठेवणे आपणास बंधनकारक राहील.

१८. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते आपणावर बंधनकारक राहील.

१९. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर झालेली आहे त्यांनी रक्कम रूपये १००/– चे स्टॅम्प पेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (affidivit) प्रतिज्ञापत्र करून आवश्यक आहे.

२०. सदर कामासाठी ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

२१. सदर काम पूर्ण झालेनंतर संगणक विभाग प्रमुख यांच्या अहवालानंतर बिल अदा केले जाईल.

२२. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

२३. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर निविदा कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

२४. सदरची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

———————‘‘————————